# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


प्रेस नोट क्र-१८६ दिनांक - ११/०५/२०२४

**काशिगांव पोलिस स्टेशनच्या हद्दीत ३ आरोपीतांना अटक करुन त्यांच्याकडुन ०२ किलो गांजा हा अंमली पदार्थ जप्त करण्यात गुन्हे प्रकटीकरण पथकाला यश.**

दिनांक ०३/०५/२०२४ रोजी २०.०० वा.सुमारास काशिगांव पोलिस स्टेशनच्या हद्दित ब्रॅन्ड फॅक्टरी जवळ एक इमस गांजा हा अंमली पदार्थ विक्री करण्या करिता येणार असल्याची माहिती गुप्त बातमीदार यांच्याकडुन मिळाल्याने प्राप्त माहितीच्या आधारे कारवाई केली असता इसम नामे प्रकाश विक्रम जाधव,वय ५४ वर्षे,पत्ता - रुम नंबर ५०१,कृष्णा लिला बिल्डींग,प्लेझंट पार्क,मिरा रोड पुर्वे,ठाणे यांस ताब्यात घेवुन त्याच्या अंगझडतीमध्ये एकुण २३,३००/-रु.अं.कि.चा **एकुण वजन १ किलो ४० ग्रॅम** वजनाचा गांजा हा अंमली पदार्थ मिळुन आल्याने तो जप्त करण्यात येवुन त्याला अटक करुन त्याच्या विरुद्ध काशिगांव पोलिस स्टेशन येथे गु.र.नं ०९०/२०२४ एन.डी.पी.एस कायदा कलम ८(क), २० (बी) २ (ए) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दिनांक ०८.०५.२०२४ रोजी रात्री ०३.०० वा सुमारास **काशिगांव** पोलिस स्टेशन, गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार हे पोलिस स्टेशन हद्दीत गस्त करत असतांना जरीमरी तलाव, **काशिगांव** येथे दोन संशयित इसम पोलिसांना पाहुन रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या डंम्परच्या पाठीमागे जावुन लपले त्यांच्यावर संशय आल्याने त्यांना विश्वासात घेवुन त्यांच्याकडे चौकशी केली असता त्यांच्या जवळ गांजा हा अंमली पदार्थ असल्याची खात्री झाली त्यांची अंगझडती घेतली असता त्यांच्याकडुन एकुण २३,५००/ रुपये कि.चा. **एकुण ०१ किलो २४ ग्रॅम** वजनाचा गांजा हा अंमली पदार्थ मिळुन आला आहे.त्या दोघांना ताब्यात घेवुन त्यांचे नांव, पत्ता विचारले असता त्यांनी त्यांची नांवे १) राजन वसंतभाईं पटेल,वय २३ वर्षे,पत्ता- राजकोट,गुजरात,२)सागर चिमनभाई वगासीया,वय २४ वर्षे पत्ता- राजकोट,गुजरात असे सांगुन त्यांना त्यांच्याकडुन जप्त करण्यात आलेला गांजा हा अंमली पदार्थ विक्री करिता कोठुन आणला असे विचारले असता त्यांनी गांजा हा अंमली पदार्थ **राजकोट, गुजरात** येथुन विक्री करण्याकरिता आणला असल्याचे सांगितले आहे. त्यांच्या विरुद्ध **काशिगांव** पोलिस स्टेशन गु.र.नं ९९/२०२४ एन.डी.पी.एस कायदा कलम कलम ८(क),२०(बी) २(ए) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन.पुढील तपास काशिगांव पोलिस स्टेशनचे पोलिस उपनिरीक्षक/किरण बगडाणे हे करत आहे.

वरिल नमुद कारवाईमध्ये ३ आरोपीतांना अटक करुन त्यांच्याकडुन एकुण ४६,६००/ रु किं.चा **एकुण ०२ किलो ६४ ग्रॅम** वजनाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.सदरची कामगिरी श्री.प्रकाश

गायकवाड,पोलिस उप आयुक्त परिमंडळ ०१, डॉ विजय मराठे,सहाय्यक पोलिस आयुक्त, मिरा रोड विभाग,राहुलकुमार पाटील,वरिष्ठ पोलिस निरीक्षक,काशिगांव पोलिस स्टेशन यांच्या मार्गदर्शनाखाली काशिगांव पोलिस स्टेशनचे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी/अंमलदार यांनी केली आहे.

--------------00000-------------